
# विद्यावार्ता®

MAH/MUL/02051/2012
ISSN-2319 9318

SPECIAL ISSUE-2020 01

Peer Reviewed International Refereed Research Journal


**शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**


यांच्या संयुक्त विद्यमाने

## ''राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान '' या विषयावर

## एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

प्राचार्य

डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव



38) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : समतेचा विचार आणि कृती ||134
प्रा.डॉ. आचार्य आर. डी., परळी

39) महात्मा फुले यांचे वाङ्मयीन कार्य ||138
डॉ. रंजना बाळासाहेब पाटील, पुणे

40) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'बहिष्कृत भारत' मधील अग्रलेख ||141
डॉ. सोमनाथ महादेव दडस, पुणे

41) महात्मा फुले यांच्या साहित्यातील समाज चिंतनशीलता ||144
प्रा. हारकर दत्तात्रय बद्रीनाथ, बीड

42) शाहू, फुले, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार ||146
डॉ. महेश प्रल्हादराव गोमारे, मेरपरसोपंत

43) महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य ||149
प्रा. डॉ. विश्वनाथ कोवकर, औरंगाबाद

44) राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक विचार ||153
श्री. बापू तुकाराम बाराते

45) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार व सद्य:स्थिती ||156
प्रा. डॉ.पाटील बलभीम अमृतराव, केज

46) शाहु, फुले, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार ||160
प्रा.डॉ. हरीशचंद्र मधुकर गायकवाड, उस्मानाबाद

47) राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रिशिक्षणविषयक कार्य ||162
प्रा.डॉ. ओ. म. गजभिये, बुलडाणा

48) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक कार्यातील योगदान ||166
प्रा. गजानन रामाजी घुमडे, चंद्रपूर

49) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार व कार्य ||170
प्रा. गोंदकर तुकाराम दत्तात्रय, बीड

50) डॉ. बी. आर. अम्बेडकर : वर्ग संघर्ष– श्रमिक, किसान और दलित ||172
डॉ. सुब्राव नामदेव जाधव, बार्शी

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

44

# राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक विचार

श्री. बापू तुकाराम बाराते
संशोधन विद्यार्थी

**********

**प्रस्तावना :—**

महाराष्ट्राला ज्याप्रमाणे संतांच्या विचारांचा वारसा लाभला आहे, त्याचप्रमाणे थोर महापुरुषांच्या विचारांचाही वारसा मिळाला आहे. या महापुरुषांमध्ये महात्मा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रणी आहे. राजर्षी शाहू महाराजांनी सत्ता आणि संपत्ती ही एक सामाजिक दृष्ट्या नैतिक जबाबदारी आणि ठेव समजून आपले आयुष्य खर्ची घातले. त्यांच्या स्वभावातील मानवतेचे दर्शन त्यांच्या जीवनकार्यातून प्रतीत होते. समाजातील उच्च—नीचता व जातीभेद यांचे उच्चाटन करण्याचा विडा महात्मा फुले यांनी उचलला होता. त्यांची अपूरे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्दीत केले. कोल्हापूरच्या चौथ्या शिवाजी महाराजांचा २५ डिसेंबर १८८३ रोजी मृत्यू झाला आणि कोल्हापूरच्या गादीवर पुन्हा एकदा नवीन वारसास दत्तक घ्यावे लागले. राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंत घाटगे होते. यांचा जन्म ई. स. १८७४ मध्ये आबासाहेब घाटगे यांचे पोटी झाला. महाराणी आनंदीबाईनी १८८४ मध्ये यशवंतरावांना दत्तक घेतले व त्यांचे नामकरण शाहू असे केले. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण राजकोट (गुजरात) व धारवाड (कर्नाटक) येथे झाले. वयाच्या सतराव्या वर्षी बडोद्याचे सरदार गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीशी त्यांचा विवाह संपन्न झाला. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्याभिषेक विधी संपन्न झाला, तेंव्हा पासून ते ६ मे १९२२ पर्यत २८ वर्षे कोल्हापूरचे महाराज म्हणून त्यांनी या काळात विविध प्रकारची

सामाजिक कार्ये केली. राजर्षी शाहू महाराज यांचे बद्दल महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात की, 'शाहू महाराज नुसता मराठा नव्हता, ब्राह्मणेतर ही नव्हता, तो नवयुगातला सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष होता.''

**उद्दिष्ट्ये :—**

१. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक विचारांचे व कार्यांचे स्वरूप अभ्यास करणे.
२. राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्यताविषयक विचार व कार्य अभ्यास करणे.
३. राजर्षी शाहू महाराजांचे भटक्या विमुक्त जमातीविषयी विचार व कार्यांचा अभ्यास करणे.
४. राजर्षी शाहू महाराजांचे आरोग्य विषयक विचार आणि कार्यांचा अभ्यास करणे.

**गृहितके :—**

१. सामाजिक विचार व कार्यांचे आद्यप्रवर्तक राजर्षी शाहू महाराज
२. दलितोद्धारक राजर्षी शाहू महाराज
३. आरोग्याची जोपासना करणारे राजर्षी शाहू महाराज
४. वेटबिगारी प्रथेचे उच्चाटन करणारे राजर्षी शाहू महाराज

**संशोधन पद्धती :—**

राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक विचार आणि कार्य या प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा आधार घेतला आहे. त्यामध्ये विविध पुस्तके व संदर्भ ग्रंथ यांचा समावेश आहे. विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**विषय विश्लेषण :—**

**१. वेठविबारी प्रथेचे उच्चाटन :—**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्दीमध्ये विविध प्रकारचे सामाजिक कार्य केले आहे. सामाजिक परिवर्तनाच्या कार्याची सुरुवात त्यांनी स्वत: पासून केली आहे. म्हणून त्यांना 'कृतिप्रवण राजे' या उपाधीने संबोधिले जाते. भारतीय संसदेने वेठबिगारी प्रथा बंद करण्याचा कायदा १ जानेवारी १९७६ मध्ये संमत केला. परंतू राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकाराभाराची सूत्रे हातात घेताच १८९४ साली वेठबिगारी प्रथा वटहुकुम काढून बंद केली. दुर्बल घटकांना खास संरक्षण दिल्या शिवाय त्यांनी [illegible] याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना होती. या कार्यातून त्यांनी १९१८–१९ मध्ये महार वतने व कुलकर्णी पद्धती बंद केली.

**२. दलितोद्धार :—**

राजर्षी शाहू महाराज खरे दलितोद्धारक होते. दलितांचा उद्धार करण्याची त्यांची उक्ती आणि कृती एकच होती. राजर्षी शाहू महाराजांनी दलित व अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मूलगामी विचार मांडले. त्या विचारांना कायद्याचे स्वरूप दिले. यामध्ये त्यांनी सामाजिक सुधारणांचा स्वीकार केला. सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे तत्वज्ञान समाजापुढे मांडले. दलित व अस्पृश्य माणसाला माणूस म्हणून माणसाप्रमाणे वागविण्याचे कार्य चिंतनीय व ऐतिहासिक स्वरूपाचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. याचाच एक भाग म्हणून ते स्वतः विविध जाती–धर्मातील शंभर लोकांना एकत्र घेऊन भोजन करीत असत. त्यांनी आपल्या राज्यात दलितांसाठी आरक्षण सर्वप्रथम लागू केले.

१५ एप्रिल १९२० मध्ये त्यांनी नाशिक येथील भाषणात जातीवादाचा विरोध केला, तसेच कोल्हापूर नगरपालिकेमध्ये अनुसूचित जाती–जमातींसाठी राखीव जागांची तरतूद केली. त्यामध्ये एक अस्पृश्य व्यक्ती निवडून देखील आला. १९१८ मध्ये त्यांनी आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली. राजर्षी शाहू महाराज गादीवर बसण्यापूर्वी प्रमुख महत्वाच्या पदांवर लोकांची जी भर्ती होत होती, त्यांमध्ये ५०० पैकी ४९० व्यक्ती ब्राह्मण होत्या, तर केवळ १० व्यक्ती ब्राह्मणेतर होत्या. त्यांनी यामध्ये सामाजिक परिवर्तन करून १०० पैकी केवळ ३५ ब्राह्मण ठेवले.

**३. फासेपारध्यांना माणसात आणण्याचे कार्य:—**

समाजात अगदी तळाच्या पातळीवर असलेली फासेपारधी ही एक वन्य जमात आहे. जंगलात फासे टाकून पक्षी व ससे पकडण्याचे व त्यांवरच आपला उदरनिर्वाह करण्याचे कार्य करीत होते. परंतू उदरनिर्वाह योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे त्यांनी वाटमारी करण्याचा व्यवसाय आरंभ केला. त्यामुळे जनता हैराण झाली. याची वार्ता राजर्षी शाहू महाराजांना समजल्यानंतर त्यांनी सैनिक पाठवून या जमातीस अटक केली.

अटक केल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास न देता अन्न—पाणी दिले. त्यांची विचारपूस केली. तसेच त्यांचे प्रश्न समजून घेतले. त्यांना घरे व शिक्षा देण्याची व्यवस्था केली. समाजाने झिडकारलेल्या अनाथ फासेपारध्यांसाठी आस्थेने व कळकळीने विचार व कृती करणारे राजर्षी शाहू महाराज हे एकमेव संस्थानिक होते. केवळ नीतीमत्तेचे धडे देऊन पोट भरत नसतं. त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे सामाजिक विचार राजर्षी शाहू महाराजांनी मांडले.

**४. आरोग्य विषयक सामाजिक विचार व कार्य:—**

माणसाकडे कितीही वैभव असले तरीही त्या सर्व वैभवापुढे त्याचे आरोग्य निकोप व सुदृढ असणे आवश्यक असते. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या आरोग्याची जोपासना तर केलीच त्याचबरोबर आपल्या राज्यातील जनतेच्या शारीरिक आरोग्याची काळजी घेतली. याकरीता मल्लविद्या व कुस्ती यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांना आश्रय दिला. त्यांनी पैलवानांसाठी पेन्शन योजना सुरू केली.

**५. दुष्काळ विषयक विचार व कार्य :—**

सन् १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानाचा कारभार पहाण्यास राजर्षी शाहू महाराजांनी सुरूवात केली आणि दुष्काळाचे सावट निर्माण झाले. यामध्येच प्लेगाच्या साथीने हाहाकार निर्माण केला. बावीस वर्षाच्या या तरूण राजाने दोन्हीं प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीशी झूंज दिली. राजर्षी शाहू महाराजांनी स्वत: दुष्काळाची पाहणी केली. त्यावर विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या. त्यांनी प्रशासकीय पातळीवरून कमी मुदतीच्या व दीर्घ मुदतीच्या ताबडतोब मदत योजना केल्या. स्वस्त धान्य दुकानांची सुरूवात केली. धान्यांच्या आयातीचे धोरण आखले. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. रस्ते व पूलांची बांधणी केली. दुष्काळी भत्ते सुरू केले. ३१ मे १९०० पर्यंत सुमारे १५२६७ रुपये दुष्काळावर खर्च केले. लहानमुलांसाठी योजना आखल्या. लहानमुलांना संभाळण्यासाठी निवारा उभारला व दाईची सोय केली. त्यांचेसाठी दूध व पाण्यासाठी शासकीय खर्च केला. गरीबांसाठी आश्रमांची स्थापना केली. ४८७८५ गरीब लोकांच्या जेवणाची व्यवस्था केली. वृद्ध, अंध, अपंग अशा दीनदुबळ्यांसाठी भिक्षा वितरण केले.

१८९८ ते १८९९ मध्ये प्लेगची लागण फार मोठ्या प्रमाणात झाली होती, शिरोळ, गडहिंग्लज या परिसरात प्लेगची साथ अधिक होती. १८ खेड्यांत ३११३१ लोकांना या प्लेगची लागण झाली होती. राजर्षी शाहू महाराजांनी प्रथम चूकीच्या समजुती दूर केल्या. प्लेगाबद्दल जनजागृती करणारी शासकीय पत्रके वाटली. लोकांचे अवागमन प्रतिबंधित केले. लोकांची वैद्यकीय तपासणी केली. तसेच प्लेगची लागण असण्याऱ्या लोकांना शोधून काढण्यासाठी ५ ते १५ रुपयांपर्यंत बक्षिस जाहिर केले. अधिकाऱ्यांना सक्त ताकीद दिली. रूग्णांचे लसीकरण केले. इतरांना प्रोत्साहन मिळावे म्हणून घरातल्या नोकरांसह राजर्षी शाहू महाराजांनी स्वत:ला प्लेगाची लस टोचून घेतली.

**समारोप :—**

राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक विचार आणि कार्य अत्यंत महत्वपूर्ण आहे व राष्ट्राला नवीन दिशा देणारे ठरले. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची अंमलबजावणी आज एकविसाव्या शतकामध्ये देखील शासन करीत आहे. एवढे दूरदर्शी राजर्षी शाहू महाराज होते. समाजातील विषमता, अस्पृश्यता, जातीभेदा यांचे निर्मूलन करण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले.

**संदर्भ सूची :—**

१. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ — महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई
२. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ — सं. डॉ. जयसिंगराव पवार, कोल्हापूर
३. महाराष्ट्रातील समाज सुधारक — डॉ. साहेबराव गाढाळ, औरंगाबाद
४. समाजशास्त्रीय विचारवंत — डॉ. ज्योती डोईफोडे, औरंगाबाद
५. दलितोद्धार ( राजर्षी शाहू गौरव ग्रंथ ) — ॲड. शंकरराव खरात, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई

❑❑❑

ISSN 2349-638x
Impact Factor 6.293

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 65

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Prof.G.V.Baviskar
Head, Dept. of History
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Dr. B.V.Gund
Head, Dept. of Pol.Sci.
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Prof. B.J.Kukde
Head, Dept. of Sociology
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Chief Editor
Prof. Pramod Tandale

| Sr No | Author Name | Title of Article | Page No. |
|---|---|---|---|
| 45 | प्रा. धनाजी दौलतराव भोसले | भारतातील समकालीन समस्या आणि महात्मा फुले यांच्या विचारांची आवश्यकता | 139 |
| 46 | प्रा. शितल लहू बोडके | महिला सबलीकरण आणि सदयास्थिती | 141 |
| 47 | सौ. साक्षी खेडेकर | सोशल मिडियातील तरुणाई... | 143 |
| 48 | प्रा. अशोक रामचंद्र गोरे | सामाजिक न्याय | 146 |
| 49 | प्रा. डी. एम. शिंदे | भारतातील वाढती लोकसंख्या -एक सामाजिक समस्या | 148 |
| 50 | प्रा. सौ. संगिता पाटील | भारतातील वाढती लोकसंख्या—परिणाम | 150 |
| 51 | श्री. बापू तुकाराम बाराते | लोकसंख्या वाढीच्या समस्या | 152 |
| 52 | प्रा.माधव उत्तमराव उगिले | महिला सबलीकरण : आव्हाने आणि उपाय | 154 |
| 53 | प्रा.डॉ. नागोराव संभाजी भुरके | लोकसंख्या वाढ एक समस्या | 157 |
| 54 | Dr.Sainath Radhesham Bansode | Problems of Population in India | 159 |
| 55 | Mr. Jagadananda Ray<br>Dr. S. J.Chandrashekhar | The Role of Yoga for the Development of Human Values | 161 |
| 56 | Dr. Chandrakant Kamble | Social Issues In The Globalization Age | 163 |
| 57 | **प्रा. डी.डी. गायकवाड** | **सामाजिक न्याय - राजर्षी छ. शाहू महाराज : एक समाजशास्त्रीय अभ्यास** | 166 |
| 58 | Aparna Vishwanath Kalyankar | A Study on Issues and Challenges of Women Empowerment in India | 168 |
| 59 | प्रा.बी.जे.कुकडे | लिंगभेदाची समस्या | 172 |
| 60 | प्रा.प्रकाश साहेबराव काळवणे | भारतातील लोकसंख्येची समस्या | 175 |
| 61 | प्रा. शरद शंकर गायकवाड | महिलांचे सशक्तीकरण व महिला चळवळी एक समाजशास्त्रीय दृष्टीकोन | 178 |
| 62 | प्रा. जे. एन शितोळे | लोकसंख्यावाढीतील आहार आणि पोषण विषयक समस्या | 180 |
| 63 | प्रा.सौ.माधुरी गोविंद गिरी | लोकसंख्या वाढीची समस्या | 183 |
| 64 | प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड | स्त्री-पुरुष असमानता निर्मूलनाचा दृष्टिकोन | 185 |

# लोकसंख्या वाढीच्या समस्या

संशोधन विद्यार्थी
श्री. बापू तुकाराम बागा

**प्रस्तावना :-**

भारतातील सामाजिक समस्यांच्या अध्ययनाचा प्रारंभ लोकसंख्येच्या समस्येपासून करणे योग्य ठरते कारण दारिद्र्याची समस्या बेरोजगारीची समस्या, बेकारीची समस्या अशा आणि अनेक समस्यांची निर्मिती लोकसंख्या वाढी मुळे होते लोकसंख्या वृद्धीचे आर्थिक व सामाजिक जीवनावर व्यापक स्वरूपाचे परिणाम होतात. प्रजनन ही जैविक घटना असली तरी ही जैविक घटना निर्धारित करणारे घटक सामाजिक आहेत. लोकसंख्या या शब्दावरून समाजातील एकूण लोकांची संख्या असा अर्थव्यक्त होतो. लोकसंख्या सिद्धांत मांडत असताना विचारवंत मालथस म्हणतात की लोकसंख्या वाढ भूमितीय श्रेणी मध्ये होते तर अन्न धान्य वाढ गणितीय श्रेणीमध्ये होते.

जगभर लोकसंख्या सतत वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे लहान वयातच कोट्यावधी लहान बालकांना आपले बालपण विसरून, विदारक वास्तव जीवनाला सामोरे जावे लागत आहे. उत्पन्न कमी आणि खर्च जास्त यामुळे अनेक विकसनशील व अविकसित देशातील कोट्यावधी लोकांना प्राथमिक मुलभूत गरजांची पूर्तता करता येत नाही सर्व देश योजनाबद्ध पद्धतीने आर्थिक विकासासाठी शर्तीचे प्रयत्न करून सुद्धा त्यांना हवे ते यश मिळणे, दुरापास्त होऊन बसले आहे
उदा. भारताचे २०२० मध्ये जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न स्वप्नच राहिले आहे.

**उद्दिष्टये :-**

१) लोकसंख्या वाढीचे स्वरूप अभ्यासणे.
२) लोकसंख्या वाढीच्या समस्याचे स्वरूप अभ्यासणे.
३) लोकसंख्या वाढीच्या समस्यांची तीव्रता अभ्यासणे.

**ग्रहीतके :-**

१) लोक संख्या वाढीमुळे लोकांना मूलभूत गरजा पूर्ण करताना संघर्ष करावा लागतो
२) लोकसंख्या वाढीचा पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होत आहे
३) बेकारीच्या प्रमाणात वाढ होत आहे.
४) भूखंड कमी कमी होत आहे

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे या करिता दुय्यम स्वरूपाचे तथ्य वापरली आहेत. संदर्भ ग्रंथ व पुस्तके वर्तमान पत्रे आणि इंटरनेटचा आधार घेतला आहे

**विषय विश्लेषण ;-**

भारताची लोकसंख्या मागील ११० वर्षापासून वाढतच आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात आणि स्वरुपात बदल होणे अनिवार्य आहे. परंतू कोणत्या ही देशाला आपल्या विकासाचे उद्दिष्ट सध्या करण्यासाठी गुणात्मक लोकसंख्या वृद्धी अभिप्रेत असते परंतू लोकसंख्यावाढीमुळे विविध समस्यांची निर्मिती होत आहे भारताकडे विश्वातील एकूण भूखंडापैकी २.४ % भूखंड आहे तर देशाच्या वाट्याला १७.२% लोकसंख्या आली आहे. लोकसंख्या वाढीच्या परिणामांतून विविध समस्यांची निर्मिती होत आहे

१) पर्यावरण आणि लोकसंख्यावृद्धी :- १९०१ मध्ये आपल्या देशाची लोकसंख्या २३ कोटी एवढी होती. ती आज १३३ कोटी पर्यंत पोहोचली आहे. मागील १० वर्षात लोकसंख्यावाढीचा दर कमी झाला आहे, मात्र मूळ लोकसंख्या वाढतच आहे भारताचा १९% भूभाग जंगलाने व्यापलेला आहे परंतू दिवसेने दिवस हे प्रमाण कमी होत आहे नैसर्गिक साधन संपत्ती नष्ट करण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. नैसर्गिक हानीमुळे केवळ जैविक विविधतेला धोका पोचला आहे, नाही तर मानवासाठी सुद्धा धोक्याची घंटा वाजत आहे. प्रत्येक दिवशी एका फूटबालच्या मैदानाएवढे जंगल नष्ट केले जात आहे प्रत्येक वर्षी एक कोटी सत्तर लाख (१,७०,०००) हेक्टर वरील वनस्पती आणि १४० प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. परिसंस्थेचा समतोल ढासळत आहे. याचा विपरीत परिणाम म्हणून जंगली प्राणी मानवी वस्तीकडे वाटचाल करीत आहेत बिबट्याच्या हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडल्याच्या घटना रोज

वर्तमानपत्रात येत आहेत. कांही राज्यात अतिवृष्टी तर कांही राज्यात अनावृष्टी या सारखी परिस्थिती निर्माण होत आहे भारतात प्रथम चेरापुंजी या ठिकाणी तर आता सातारा जिल्ह्यात होत आहे. हा परिणाम वाढती लोकसंख्या आणि पर्यावरणाचा –हास याचा आहे.

२) लोकसंख्यावाढ आणि प्रदूषण:- १८ व्या शतकापासून जगातील लोकसंख्या सतत वाढत आहे १८५० मध्ये जगाची लोकसंख्या १०० कोटीच्या जवळपास होती. तर २०११ मध्ये ७०० कोटी पर्यंत पोचली आहे. यामुळे प्रदूषण पातळीत वाढ होत आहे मानव ज्या ठिकाणी पोचला, त्या प्रत्येक ठिकाणी प्रदूषण करीत आहे प्रदुषणाचाच एक परिणाम म्हणून दिल्लीवासीयांना श्वास घेणे कठीण झाले आहे. वाहनांचे वाढते प्रमाण, औद्योगिक वसाहती व पंजाब, हरियाणा मधील फालारीचे ज्वलन या समस्येला कारणीभूत आहे. भारतात गंगा नदीला अत्यंत पवित्र मानले जाते, पण एक देखील नदी, सरोवर प्रदूषणमुक्त नाही म्हणून पंतप्रधान स्वतः कृती करून नमो गंगे प्रकल्प, स्वच्छता मोहीम राबवत आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे सर्वच प्रकारचे प्रदूषण होत आहे.

३) आवश्यक गरजांची अपूर्तता:- वाढत्या लोकसंख्येमुळे कमावणारे कमी आणि खाणारे अधिक झाले आहेत कांही लोकांना अन्न, वस्त्र, निवारा या गरजा पूर्ण करणे शक्य नाही जगातील ७८ कोटी लोकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे पोटाचे विकार वाढत आहेत. २४० कोटी लोकांकडे शौचालयाची व्यवस्था नाही किंवा त्याचा वापर योग्य प्रमाणात होत नाही. ७७ कोटी लोकांचे उत्पन्न ११२ रुपयांपेक्षा कमी आहे. ५८ कोटी लोकांकडे वीज पोचलेली नाही. जगातील २० कोटी लोकांना उपाशीपोटी झोपावे लागते. या सर्व लोकसंख्यावाढीच्या समस्या आहेत.

४) बेकारी किंवा बेरोजगारी :- वाढत्या लोकसंख्येचा एक परिणाम म्हणून बेकारीकडे पहिले जाते आपल्या देशात ऐच्छिक-अनैच्छिक-हंगामी-सुशिक्षित अशी आठ प्रकारची बेरोजगारी आहे व्यक्तीची शारीरिक-मानसिक क्षमता असताना काम करण्याची इच्छा असताना व्यक्तीच्या दोन हातांना काम उपलब्ध ना होणे म्हणजे बेरोजगारी होय. या समस्यांमुळे एक कोटी वीस लाख लोकांना बेरोजगारीयुक्त जीवन जगावे लागते. जगात २७ कोटी अशिक्षित बेरोजगार आहेत. एवढेच नव्हे तर एम. बी. ए. सारखे उच्च शिक्षण घेणाऱ्याना केवळ ७ टक्के लोकांना मनासारखे काम उपलब्ध होते. इतर ९३ टक्के लोकांना १० ते १२ हजार रुपये वेतनाची नोकरी स्वीकारावी लागते.

एखाद्या राष्ट्राकडे एकूण जी साधन संपत्ती असते, त्या पेक्षा अधिक लोकसंख्या वाढली तर अतिरिक्त लोकसंख्या ठरते भारताकडे अतिरिक्त लोकसंख्या आहे. त्यामध्ये आणखी नागरिक सुधारणा विधेयक २०१९ ने भर घातली आहे. बांगलादेश, अफगाणिस्तान व पाकिस्तान या देशांतील इस्लाम व्यतिरिक्त अन्य धर्मांच्या व्यक्ती भारतात वास्तव्याला येऊ शकतात. यातून देखील लोकसंख्यावाढीच्या नवीन समस्या निर्माण होतील.

निष्कर्ष :-

१) भारतातील लोकसंख्यावाढीचा दशवार्षिक सरासरी दर २३ टक्क्यावरून १७ टक्क्यावर आला आहे.
२) मूलभूत गरजांपेक्षा दुय्यम गरजांवर अधिक खर्च होत आहे
३) पर्यावरणाचा तीन पटीने –हास वाढला आहे.
४) बेरोजगारीमध्ये सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण वाढले आहे

शिफारशी :-

१) लोकसंख्यावाढ कमी करण्यासाठी 'हम दो हमारा एक' हा नारा द्यावा लागेल.
२) गरजा मर्यादित ठेवाव्या लागतील.
३) प्रत्येकाने पर्यावरणाचे सम्वर्द्धन स्वतःच्या कृतीतून करावे.
४) कौशल्यावर आधारित शिक्षण घ्यावे लागेल.
५) शासनाने कठोर नियमावली करावी.

संदर्भ ग्रंथ-

१) लोकसंख्या आणि समाज – डॉ. दा. धो. काचोळे
२) लोकसंख्या आणि भारतीय समाज – प्रा. अशोक गोरे
३) भारतीय सामाजिक समस्या – प्रा. रा. ज. लोटे
४) सामाजिक समस्या – डॉ. सुमन पाटे
५) इंटरनेट
६) यु ट्यूब